# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०४.०३.२०२४

- **अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०३/०३/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ७५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

- **दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०३/०३/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १,४२,३४०/— रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

- **अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या वाळुची चोरी करण्याऱ्या विरुध दि. ०३/०३/२०२४ रोजी एकुण ०१ ठिकाणी कलम ३७९ भादवी सहकलम ४८(७)(८) गौ ख अधि अन्वये कार्यवाही करण्यात आली.

१) पोस्टे आ.बाळापुर हददीत मौजे दाती फाटा वारंगा ते बाळापुर रोडवर टिप्पर ज्यात ०३ ब्रास रेती ,एक टिप्पर आर.टी.ओ.पासींग नसलेला असा एकुण ५,१५,००० रू मुद्देमाल यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या वाळुची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने ०१ आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.